॥ श्री ॥

॥ बाबा ॥

## लोण्याची वाटी

खा रे लाला लोण्याचा गोळा
खा रे लाला खा ॥धृ॥

वांगणी मंदिरी येऊन रे
गोपाशी खेळ खेळूनी रे
कधी चकवा खेळशी कधी देशी खुशी
आनंदाचे लोणी तू खा ॥1॥

प्रेम तुझे ह्रदयी साठवून रे
वासनांचे मडके फोडुन रे
क्रोध जाईल जळून भक्ति येई बहरून
भोळ्या भावाचे लोणी तू खा ॥2॥

देहाचा माठ करून रे
मोह माया विरजुनी रे
श्रद्धेची रवि निष्ठेची दोरी
घुसळूनी, घुसळूनी खा ॥3॥

लोण्याची सात्विकता अविट रे
जशी तुझी नी माझी एकरूपता रे
षड्‌विकार जाती जळून चैतन्य येई फुलून
ह्रदयाच्या आसनावरी ये
प्रितीचे लोणी तू खा ॥4॥

★★★★★